Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259

| Vol - V | Issue-III | MARCH | 2018 | ISSN 2349-638x | Impact Factor 4.574 |
|---|---|---|---|---|---|

# लोकशाहीच्या विविध सिध्दांताचे विश्लेषण

**प्रा.डॉ. आर. बी. लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर

लोकशाहीचा हा सिध्दांत पण सर्वसामान्य व्यक्तींच्या बदल्यात समुहांच्या भूमिकेवर भर देतो. अभिजनवादी सिध्दांत आणि अनेकसत्तावादी सिध्दांताचे मिश्रण करुन नव्या सिध्दांताची मांडणी करण्याचे प्रयत्न काही विचारवंतांनी केले. अनेकसत्तावादी सिध्दांताचा

उदय अभिजनवादी सिध्दांताच्या आंशिक प्रतिक्रियेच्या रुपातून झाला. या सिध्दांताने उदारमतवादी लोकशाहीतील अभिजनवादी प्रवृत्तीस निष्प्रभावी करुन योग्य जन आकांक्षांना प्रकट करतो.

**अनेकसत्तावादी सिध्दांत :**

अनेकसत्तावादी सिध्दांत जुनाच आहे. परतु २० व्या शतकात तो आधुनिक उदारमतवादी चिंतनाचा एक महत्वुपर्ण भाग बनला. सामान्यत: विचार करता हा सिध्दांत सत्तेला समाजातील एका छोटया समुहापर्यंत मर्यादित करण्याऐवजी त्यास प्रसारित आणि विकेंद्रीत करतो. आधुनिक उद्योग, व्यवसाय व तंत्रज्ञानाच्या युगात

यांच्या मते सत्ता विभागली आहे. यात सार्वजनिक आणि खाजगी समूहाची स्पर्धात्मक भागीदारी वाढली आहे.उच्च स्थानावर असलेल्या लोकांकडे पूर्वीप्रमाणे सत्ता राहिली नाही. कारण ते परस्पर विरोधी स्पर्धात मध्यस्थाची भूमिका बजावत आहेत. अनेक समूह आपल्या नेतृत्वाच्या माध्यमातून मध्यस्थता करतात. ज्यातून अप्रत्यक्षरित्या व्यक्तीचे ही प्रतिनिधीत्व होते. जर औद्योगिक आणि तंत्रज्ञान एकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या मालकीमुळे सत्ता काही व्यक्तिकडे केंद्रीत झाली. पंरतु अल्पसंख्यांक व्यापक हित समुहात सार्वजनिक हिताच्या बाजूने जातात. मोठे व्यापारी घराणे, श्रम आणि शासनातील स्पर्धेने प्रत्येक समुहास आपल्या सत्तेचा दुरुपयोग करण्यावर नियंत्रण आणले.अशा प्रकारे नागरीकात संपत्ती, शिक्षण अणि सत्तेतील विषमतेस नम्रपणे प्रभावित केले. कारण संघटन आणि समूह यापेक्षा अधिक प्रतिनिधीत्व देतात. त्यामुळे लोकशाही अधिक वास्तविक बनते. या अर्थाने ती अधिक व्यवहार्य बनते. उदा : भारत. याठिकाणी महेंद्रसिंह टिकैतचे शेतकरी संघटन आणि नर्मदा बचाव आंदोलनासारखे आंदालन जे लाखो गरीब आणि अज्ञानी लोकांचा आवाज बनतात. जे लोकशाहीला अधिक वास्तववादी बनवतात. पंरतु हे सत्य आहे की, अभिजन वर्ग आणि त्यांची वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे त्यावर टिका करतात. तसेच त्यास प्रगतीचे बाधक मानतात. केंव्हा केंव्हा तर सर्वोच्च न्यायालय ही त्यांना आपल्या चळवळीस रोकण्याचे आदेश देतात.

तरीही या सर्वांच्या अडथळयाला दुर करुन यासारख्या अनेक जन आंदोलनांनी भारतीय लोकशाहीला अधिक सक्षम व मजबूत केले. लोकशाहीच्या अनेकसत्तावादी संकल्पनेचा विकास मुख्यत: अमेरिकेत झाला. या विचासरणीचे प्रणेता एस.एम. लिप्सेट,रॉबर्ट ढाल, वी.प्रेस्थस, एफ.हंटर हे प्रमुख होते. त्यांच्या मते राजकीय सत्ता जितकी सरळ वाटते ती तितकी सरळ नाही.

ती विभिन्न समुह, संघटना, वर्ग आणि विविध संघाचे नेतृत्व करणारे अभिजन वर्ग या सर्वात विभागली आहे.अनेक समुह आपल्या मागण्या व स्वार्थाला मांडतात तसेच राजकीय पक्षाच्या माध्यमातून ही त्या समोर येतात. अनेकसत्तावादी लोकशाही ही एक अशी प्रणाली आहे, ज्यात धोरण विभिन्न समुहात पारस्परिक विचार विनिमय आणि विचारांच्या आदान प्रदानातून निर्धारित केले जाते. कारण कोणताही समुह या अभिजन वर्गाइतका सक्षम नाही की तो, एकटाच शासनावर दबाव टाकून जे हित होते ते कोणत्याही सामाजिक समुह शासनाच्या नीती-निर्धारण प्रकियेला प्रभावित करतो. ज्यामुळे इतर वर्गाच्या हिताकडे दुर्लक्ष करता येत नाही.

या सिध्दांताच्या समर्थकांचे एकमत असेही आहे की, सर्व नागरीकांना राजकीय क्षेत्रात आपल्या हितास संघटीत करु नये आणि त्यास साध्य करण्यासाठी कायदयात्मक संधी आणि आर्थिक संसाधने प्राप्त असतील. या संधी शिवाय नागरीक कोणत्याही विषयाचे समर्थन किंवा विरोध करु शकत नाहीत. अनेकसत्तावादी विचारवंत राजकारणास व्यक्तिऐवजी समुहात निश्चित होणारी प्रक्रिया मानतात. लोकशाही सर्वोत्तम पध्दतीने तेंव्हाच कार्य करते जेंव्हा नागरीक आपल्या विशेष हितांच्या समर्थनार्थ समुहासी जुडतात. कोणत्याही समाजातील व्यक्तिंची सक्रीय सहभागीता असावी. त्यांनी आपले संकल्प सिध्दीस नेण्यासाठी विभिन्न समुहासी जुडावे यावर विशेष भर देतात. यासोबतच निवडणूका राजकीय निर्णयात विशाल जनसमुहाच्या सहभागतित्वाचे एक महत्वाचे हत्यार असल्याचे समुह आणि त्यांच्या सदस्यांनी हे स्विकारावे. अशाप्रकारे अभिजन वर्गाचे संपूर्ण समुह आणि सदस्यांनी परस्परांचे प्रतिस्पर्धी बनून लोकशाहीला यशस्वी करतात. यावरुन हे स्पष्ट होते की, अनेकसत्तावादी सिध्दांत वास्तवतेत अभिजनवादाचा पुर्णतः विरोधक नाही. कारण त्यांच्या समर्थकानुसार अभिजनवर्गाचे अस्तित्व एक सत्य आहे. ते त्यांच्या स्थितीवरुन संतुष्ट आहेत. या कारणाने अनेकसत्तावादी सिध्दांत केंव्हा-केंव्हा अभिजनवादी सिध्दांतापासून अंशतः भिन्न समजला जातो. महान अमेरिकन राजकीय विचारवंत रॉबर्ट ढाल लोकशाहीचा अभिजनवादी व अनेकसत्तावादी संकल्पनांना एकत्रित करुन आपल्या लोकशाही संकल्पनेस बहुतंत्राची संज्ञा देतो. त्याच्या मतानुसार जनता समुह आणि अभिजन वर्गाचे राजकारणी या दोन्हीच्या माध्यमातून सक्रिय होते. शासनाच्या धोरणाला व निर्णय प्रक्रियेला प्रभावित करणारी अनेक समुह आहेत. उदा. व्यापारी घरणे आणि उद्योगपती, सोदागर, कामगार संघटना, शेतकरी संघटना,ग्राहक मतदार ई. संपूर्ण समुह समप्रमाणात शक्तीशाली नसतात. अनेक समुह आपल्या निर्णय व धोरणाच्या मान्यते ऐवजी प्रतिकुल धोरणांची रोकधाम करण्यातच जास्त प्रभावी असतात.

अनेकसत्तावादी सिध्दांता विरुध्द अनेक टिका-टिप्पणी केल्या जातात. त्यामध्ये काही पमुख टिका टिप्पणी खालीलप्रमाणे आहेत.

१) अनेकसत्तावादी सिध्दांताच्या समर्थकांची मान्यता आहे की, विविध समुहाअंतर्गत होणाऱ्या संघर्षामुळे त्या हित किंवा अनेक अंगाना प्रोत्साहन मिळते जे स्विकारण्या जोगी आहेत. परंतु केंव्हा-केंव्हा असे दिसते की, या संघर्षामुळे वास्तव व विरोधाची स्थिती बनते. केंव्हा -केंव्हा तर फार वाईट स्थिती होते. जेंव्हा एक समुह आपल्या संपूर्ण धोरणांना मान्यता मिळून घेतो. त्यामुळे अन्य समुह नाराज व क्रोधीत होतात.

२) जनतेला सरळ सरळ आपल्या हिंताची पुर्तता व्हावी असे वाटते हे अनेकसत्तावादी सिध्दांताचे मुख्य विधान आहे. पंरतु हे सर्वथा व सर्वदा सत्य होत नाही. लोक राष्ट्रवादी किंवा इतर अभिप्रेरणामुळे पण संचलित होतात.

३) मायकेल मावगोलिसच्या मते अनेकसत्तावादी सिध्दांत समाजातील संसाधनस संवर्धित व पुर्नवितरित करण्याचे मार्ग शोधण्यात सक्षम आहे. त्यामुळे निम्न जाति, महिला, आदिवासी आणि पांरपारिक समाजातील इतर वंचित वर्गांना साधन संपन्न वर्गाप्रमाणे राजकारणातील सहभागाची समानसंधी मिळत नाही.

४) मावगोलिसच्या मते अनेक सत्तवादयाजवळ योग्य आर्थिक आणि पर्यावरणीय मुल्यावर सामाजिक समानता आणि विकासाची कोणती योजना नाही.

**सहभागी लोकशाही :**

राजकारणाच्या घटनाक्रमात सहभागीत्व लोकशाहीचे मुलतत्व आहे. परंतु भांडवली लोकशाहीत ते नेहमी निवडणूकीत मतदानापर्यंतच मर्यादित राहते. लोकशाहीच्या सहभागी त्वाचा सिंध्दात संवर्धीत भागीदारीत आदर्श

मानतो. या सिध्दांताच्या समर्थकात १९६० च्या दशकापासून कैरोल पेर्लमैन, सी.बी. मैक्फर्सन,एन.पॉलैन्ट जास सारखे साम्यवादी विचारवंत प्रमुख आहेत. सहभागी लोकशाहीचे दोन प्रमुख वैशिष्टये आहेत.

१) निर्णय घेण्याच्या प्रकियेचे विकेंद्रीकरण होणे.
२) नीती निर्धारणात सर्व सामान्यांची प्रत्यक्ष भागीदारी या सिध्दांताच्या समर्थकांच्या मते लोकशाही म्हणजे प्रत्येक व्यक्तिचे समान सहभागित्व होय, न की शासनास स्थिर बनवणे. जेंव्हा नागरीक राजकीय दृष्टया सक्रिय होवून सामुहिक समस्यात निरंतर अभिरुचि दाखवतो तेव्हा खरी लोकशाही निर्माण होते. राजकीय पक्ष अधिक पारदर्शक व उत्तरदायी बनण्यासाठी सक्रिय सहभागित्व आवश्यक आहे.

सहभागी लोकशाही सिध्दांतकारांच्या मते जर धोरणात्मक निर्णय घेण्याची जबाबदारी फक्त अभिजन वर्गापर्यंतच मर्यादित राहिली तर लोकशाहीचे वास्तविक स्वरुप बाधित होते. यासाठी ते यात आम आदमीच्या सहभागाचे समर्थन करतात. त्यांचे मत आहे की, जर लोकशाहीतील अधिकार कागदयाच्या टुकडयावर आणि संविधानातील कलमापर्यतच मर्यादित राहिले तर त्या अधिकारांना काही अर्थ राहत नाही.

अंतीमतः सामान्य लोकांकडून त्या अधिकारांचा वास्तविक उपयोग होणे आवयक आहे. पंरतु या अधिकाराचा उपभोग फक्त स्वतंत्र व समानतेची संधी असलेल्या व्यक्तिलाच घेता येतो. जर लोकांना विश्वास असेल की, धोरणात्मक निर्णयात योग्य ती सहभागीत्वाची संधी आहे तरच लोक सहभागी बनतात. अशा स्थितीत ते प्रभावीपणे भागीदारी करु शकतात. ज्या लोकशाहीत मग ती राजकीय असो की अभिजन वर्गाचे वर्चस्व असणारी ती नागरीकांसाठी संतोषदायी नसते. आम आदमी सहभीत्वाच्या साहयानेच त्या वर्गाच्या वर्चस्वास समाप्त करु शकतात.

या सिध्दांताच्या समर्थकाचे म्हणणे आहे की, आजच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञानी समाजात शिक्षणाचा स्तर उंचावला आहे. तसेच बौध्दिक आणि राजकीय जाणीवेने संपन्न समाजात श्रेष्ठीजन आणि सर्वसामान्य यांच्यातील दरी कमी झाली. त्यासाठी कार्यक्षमप्रणाली आणि विकासाच्या दृष्टीने बऱ्याच प्रकरणात सामान्य लोकांचे सहभागित्व त्रासदायक ठरले नाही. वास्तवतेत सत्तेचे वितरण हेच अत्याचाराविरुध्द सर्वात मजबुत सुरक्षा कवच आहे. नागरीकांना तटस्थता, अज्ञान आणि अलगाववादी प्रवृत्तीपासून सहभागित्वावर आधारीत लोकशही वाचवू शकते. तसेच लोकशाहीच्या मुलभूत गरजांची पुर्तता करु शकते. सर्वसामान्य व्यक्तीने राजकारणात सहभागीत्व नोंदवावे परंतु ते नोंदवण्याचे मार्ग कोणते ? याचे उत्तर सहभागी लोकशीवादयांनी खालीलप्रमाणे दिले.

निवडणूकीतील मतदान, राजकीय पक्षाचे सदस्यत्व, निवडणूक अभियानातील विविध कार्य,राजकीय पक्षांच्या घडमोडीत समावेश, समुह, स्वैच्छिक संघटना,बिगर शासकीय संघटना उदा : दबाव गट आणि लॉबिंग समुहाची सदस्यता आणि सक्रिय करार प्रदर्शनातील उपस्थिती, सविनय कायदेभंग आंदोलनातील सहभाग, ग्राहक परिषदेचे सदस्यत्व,सामाजिक धोरणाच्या जडणघडणीत सहभाग, महिला अणि बालकांचा विकास, कुटूंब नियोजन, पर्यावरण संरक्षण ई. सामुदायिक विकास कार्यातील योगदान कामगारांच्या संपातील सहभाग ई. मॅक्फर्सनच्या मते आजच्या राष्ट्रांचे प्रादेशिक क्षेत्र आणि लोकसंख्या अति विशाल आहेत. त्यामुळे संपूर्ण नागरीक दैनंदिन राजकारणातील नीती निर्धारणात सहभागी होणे शक्य नाही. तरी काही अटींना मान्यता दिल्याने सहभागित्वाचे प्रमाण निश्चितच वाढवता येते. त्या अटी खालीलप्रमाणे आहेत.

१) जर राजकीय पक्ष प्रत्यक्ष लोकशाहीच्या सिध्दांतानुसार लोकशाहीवादी बनले.
२) जर राजकीय पक्षांनी खऱ्या अर्थाने संसदीय लोकशाहीच्या संरचने अंतर्गत कार्य केल्यास.
३) जर राजकीय पक्षाचे कार्य कामगार संघटना,स्वैच्छिक संघटना समान अन्य संस्था व घटकाकडून होत असेल.

डेविड हेल्डने सहभागी सिध्दांतानुसार शंका घेताना म्हटले की, हा सिध्दांत प्राचीन, श्रेष्ठीजन, अनेकसत्तावादी यासारख्या सिध्दांतापेक्षा सरस आहे. पंरतु या सिध्दांतातून हे स्पष्ट होत नाही की, फक्त सहभागित्वच मानवीय विकासासारख्या उच्चतम ध्येयास कसे आणि का प्राप्त करु शकते. जे लोकशाहीचे एक महत्वाचे ध्येय आहे. सहभागीत्व नागरीकांना सामान्य हिताप्रति अधिक सक्रीय आणि प्रतिबध्द बनवेल. याबाबतचा कोणता तर्क संगत आधार किंवा साक्ष्य मिळत नाही. सर्वसामान्य लोक आपल्या जीवनाला प्रभावित करणाऱ्या मुदयावर धोरण निर्धारण करणे आणि निर्णय घेण्यात अधिक जबाबदारी बनु इच्छितात. या केंद्रीय मान्यतेस हेल्ड सत्य मानत नाही. जर ते सामाजिक, आर्थिक विषय आणि धोरण निर्धारणत: सहभागी होवू इच्छित नाहीत. तर त्यांना त्यासाठी प्रेरित करणे योग्य नाही. कुक आणि मॉर्गनच्या मते सहभागी लोकशाहीला प्रत्यक्षात उतरवणे आपणस वाटते तितके सोपे नाही. उदा : सहभागी घटकांचा आकार आणि कार्य काय असावेत. नागरीकांच्या सक्रिय सहभागाने स्थानिक स्तरावर घेतलेल्या निर्णयास संपूर्ण राष्ट्राच्या हितासोबत कशा प्रकारे समन्वयीत करावे ? सहभागी सिध्दांताचे समर्थक कार्यक्षमता आणि प्रभावाच्या मुद्दयावर विशेष लक्ष देत नाहीत.

**मार्क्सवादी सिध्दांत :**

लोकशाही विषयीच्या सर्वमान्य धोरणाच्या विरुध्द मार्क्स आणि पाश्चिमात्य मार्क्सवादी विचारवंतानी स्विकारले. मार्क्सवादयांची लोकशाही संबंधीची धारणा पाश्चीमात्य उदारमतवादी लोकशाही धारणेपेक्षा पुर्णत: भिन्न आहे. कारण मार्क्सवादयांचे मत आहे की, भांडवली व्यवस्थेत लोकशाहीचे अधिकार खऱ्या अर्थाने आम जनतेकडे नसून फक्त साधन-संपन्न वर्गाच्या हाथात असतात. त्यामळे ते अशा लोकशाहीतील उत्पादनाच्या साधनावरील मालकी नष्ट करुन सर्वहारावर्गाव्दारा अर्थव्यवस्थेला नियंत्रित करुन समाजवादी लोकशाहीची स्थापना करणे.

कार्ल मार्क्स उदारमतवादी संवैधानिक लोकशाहीचा कडवा विरोधक होता. कारण भांडवली लोकशाहीचा मुख्य आधार हा उत्पादनाच्या साधनांची मालकी, भांडवली वर्गाच्या नियंत्रणातील असणारी आर्थिक राजकीय व्यवस्थेला नियंत्रणात ठेवून शासन आणि राज्य व्यवस्थेला आपल्या अधीन ठेवतात. राज्य, सत्ता, अधिकार आणि विशेषाधिकार पुर्णत: याच वर्गाकडे असतात. श्रमिक वर्गाजवळ फक्त नावापुरते स्वातंत्र्य आणि अधिकार आहे. राज्याच्या अधिकारी वर्ग, न्यायालय आणि पोलिस हे तटस्थ न राहता सार्वभौम संपन्न वर्गाच्या हिताचे संरक्षक बनतात. त्यामुळे लोकशाही एक अशी शासन प्रणाली बनत आहे.

जी शासक वर्गाची सत्ता आणि विशेषाधिकारांना बढावा देते. तसेच उच्च वर्गाच्या हितांना साधण्याचे काम करते. याशिवाय मार्क्स आणि एंजेल्सने हे मान्य केले की, संपन्न भांडवली वर्गाव्दारा नियंत्रित उदारमतवादी लोकशाही कुठेपर्यत नागरीकांना वास्तविक अधिकार देण्याचा ऐतिहासिक दावा करते. तसेच श्रमिक वर्ग त्याचा वापर आपणस संघटित करुन सर्वहारा वर्गाच्या क्रांतीसाठी करतात. उदारमतवादी लोकशाहीत सर्वसामान्य लोक मतदानाच्या अधिकाराचा उपयोग सर्व वर्गाचे क्रांतीकारी आंदोलनाची पृष्टभुमि तयार करण्यासाठी करता येतो. काही स्थितीत हिंसक क्रांतीकारी आंदोलनाची आवश्यकता नाही हे मार्क्सवादी मान्य करतात. पंरतु अशा स्थितीची शक्यता अत्यल्प आहे. जर समाजवादी क्रांतीच्या ध्येयाला पुर्ण करण्यासाठी संसदीय मार्ग स्विकारला तर तो इतर प्रकारच्या संघर्षात एक अतिरिक्त सहाय्यक उपकरण होवू शकते.

मार्क्सवादी विश्लेषणानुसार वास्तविक लोकशाही सर्वहाराच्या हुकुमशाहीला कायम करण्यासाठी सर्वहारा वर्गाची क्रांतीनंतरच शक्य आहे. कारण उदारमतवादी बुजुर्वा लोकशाहीचा आदर्श प्रतिभागितेचा असतो. पंरतु वास्तवतेत साधनहीन श्रमिक वर्गाची क्रातीनंतरच शक्य आहे. कारण उदारमतवादी बुजुर्वा लोकशाहीचा आदर्श प्रतिभागितेचा असतो. परंतु वास्तवतेत साधनहीन श्रमिक वर्गाची सहभागिता त्यात होत नाही. आपले पुस्तक ४ क्रिटिक ऑफ द गोथा प्रोगाम यात मार्क्स आणि एंजेल्सने आपली संकल्पना स्पष्ट करताना लिहिले की, भांडवलदार आणि साम्यवादी समाजात एकाचे दुसऱ्यात रुपांतरण होणारी अवधी निहित असते. याशी मिळतीजुळती

एक राजकीय संकमणाची अवधी असते. ज्यात राज्य सर्वहारा वर्गाची हुकुमशाही आणि साम्यवादात फरक केला. ते त्यास एक मध्यवर्ती कालखंड मानतात. त्याची परिणीती साम्यवादी समाजाच्या स्थापनेत होते. कार्ल मार्क्स आणि एंजेल्स यांनी हुकुमशाही या शब्दाचा प्रयोग कोणत्या अर्थाने केला हे समजून घ्यावे लागेल. त्यांच्या दृष्टिने प्रत्येक राज्य शासक सामाजिक वर्गाचा हुकुमशाहाचा राहिला. भांडवली व्यवस्थेतील वर्ग संपन्न औद्योगिक आणि व्यापारी बजुर्वाचे होते. परंतु त्यांचे आपल्या कल्पनेतील राज्य क्रांतीनंतर लगेच सर्वहारांच्या नियंत्रणाचे राज्य असेल तेंव्हाच समाजवादी पुर्ननिर्माणाची प्रक्रिया प्रारंभ होईल. ज्याचा अंत एक वर्गहीन समाजाच्या स्थापनेत होईल त्यासाठी मार्क्सवादयांच्या मते लोकशाही आणि कामगारांची हुकुमशाही एक साथ चालतील. जसे भांडवली व्यवस्थेत उदारमतवादी लोकशाही, व्यवहारात लोकशाही आणि उद्योगपति व व्यापारी घराण्यांच्या बुजुर्वा वर्गाचा हुकुमशाही शासन होय. त्यासाठी मार्क्स आणि एंजेल्सचे म्हणणे होते की, क्रांती आणि श्रमिक वर्गाच्या अधिपत्यानंतरची प्रणाली जनतेच्या लोकशाहीची प्रणाली असेल. जनता म्हणजे मुठभर संपन्न बुजुर्वाच्या जागेवर जनसामान्यांची विशाल लोकसंख्या होय मार्क्सव्दारा प्रतिपादीत जनतेच्या लोकशाहीची प्रमुख वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

जनतेची लोकशाही एक अशी लोकशाही आहे ज्या कामगार वर्गाची एक विशाल भाग राजकीय आणि धोरणात्मक निर्णयाचा अधिकार अल्पसंख्य अभिजनवर्गाच्या हाथातून आपल्या हाथात होते. त्याचप्रमाणे राजकीय व आर्थिक व्यवस्थेचे अधिकार अल्पसंख्य उद्योगपति आणि व्यापारी घराण्यांच्या जवळ राहणार नाहीत. जनतेच्या लोकशाहीत उत्पादन साधने जमिन, कारखाने ई. जनतेचे प्रभुत्व असते. राज्य संपूर्ण उत्पादक भांडवली संपत्ती साधनांना आपल्या नियंत्रणात घेते. उत्पादन क्षमतेत द्रुतगतीने वृध्दि होते. त्यामुळे प्रत्येक नागरीकांला नियोजनाची समान संधी मिळते. समाजवादी लोकशाहीत कार्यकारी अणि विधायकीच्या कृत्यांचे एकत्रीकरण होते. क्रांतीनंतर सर्व श्रमिकांची सरळ निवड होते. पोलिस आणि सैन्य बलाची जागा नागरीक सेना घेते. सर्व सरकारी सेवकांना श्रमिक म्हणून समान वेतन दिले जाते.

सामाजिक पातळीवर जनतेची लोकशाही भांडवलवाद आणि साम्यवाद यामधील स्थिती आहे. व्यक्तिगत संपत्ति आणि वर्गाच्या उन्मुलनानंतर जेव्हा समाजवादी समाजाच्या स्थापनेनंतर तो पुर्णतः साम्यवादाच्या दिशेने अग्रेसर होते. पुर्ण साम्यवादाच्या अवस्थेत राज्य व्यवस्थेचा अंत होतो. त्या जागेवर एक प्रकारचे स्वशासन स्थिरावते.

मार्क्सवादयांच्या मते जनतेची लोकशाही भांडवलवाद आणि साम्यवाद यामधील स्थिती आहे. व्यक्तिगत संपत्ति आणि वर्गाच्या उन्मुलनानंतर जेव्हा समाजवादी समाजाच्या स्थापनेनंतर पुर्णतः साम्यवादाच्या दिशेने अग्रेसर होते. पुर्ण साम्यवादाच्या अवस्थेत राज्य व्यवस्थेचा अंत होतो. ज्या जागेवर एक प्रकारचे स्वशासन स्थिरावते. समाजवादी समाज रचनेने मार्क्सवादी विचारांना पुढे केले. १९१७ ला रशियात समाजवादी राज्याची स्थापना करणाऱ्या लेनिने मार्क्सवादाची मांडणी व व्याख्या नव्याने केली. त्यांने कामगार वर्गाच्या हुकुशाहीला प्राधान्य दिले.

समाजवादी क्रांतीला विशेष महत्व दिले. तसेच सर्वहारा वर्गाची हुकुमशाही साम्यवादी पक्षा मार्फतच यशस्वी होवू शकते. त्याने भांडवली लोकशाही समाजवादी लोकशाही आणि साम्यवादी लोकशाही या लोकशाहीचा तीन अवस्था सांगितल्या त्याच्यामते लोकशाही राज्याचे एक स्वरुप आहे. वर्ग-विभाजित समाजात शासन अधिनायकवादी आणि लोकतंत्रात्मक दोन्ही असते ते एका वर्गासाठी लोकशाही तर दुसऱ्यासाठी अधिनायकवादी असते. बुजुर्वा वर्ग आपले हित साधण्यासाठी भांडवली प्रणालीला नियंत्रित व संचलित करते. त्यासाठी त्यास सत्तेतून बेदखल करुन समाजवादी लोकशाहीला स्थापन करने आवश्यक आहे. नव स्थापित समाजवादी राज्य ही भांडवली राज्याप्रमाणेच शोषणात्मक असते हे लेनिनने मान्य केले. तर सर्वहारा वर्गाच्या शासनास लागू करण्यासाठी ते आवश्यक आहे. बुजुर्वा अधिक शक्तीशाली असतो. त्यामुळे समाजवादी लोकशाहीच्या प्रारंभिक युगात कामगार वर्गासाठी आवश्यक आहे की, ते बलपुर्वक भांडवली वर्गाचा समूळ नाश करतील.

१) क्रांतीस वाचवणे
२) एक नव्या सामाजिक - आर्थिक व्यवस्थेला संघटित करणे.

लेनिनच्या मते मुख्यत्वे हे कार्य साम्यवादी पक्षाला करावे लागेल. अशा प्रकारे लेनिनच्या दृष्टीने भांडवली लोकशाहीत खरी लोकशाही नसते. तर कामगारांच्या हुकुमशाहीत पुर्वीपेक्षा अधिक लोकशाही असते कारण ते बहुसंख्य कामगार वर्गाचे शासन असते. खऱ्या साम्यवादी व्यवस्थेच्या उदयानंतर लोकशाही निरर्थक बनेल. कारण त्या समाजात त्याचा काहीच उपयोग व महत्व राहणार नाही.

मार्क्स, एंजेल्स आणि लेनिनच्या नंतर अनेक विचारवंतानी मार्क्सवादाचे विश्लेषण केली. ज्यात एडवर्ड बर्नस्टाईन, कार्ल कॉट्स्की, रोजा लक्जमबर्ग इ. प्रमुख आहेत. एडवर्ड बर्नस्टाईनच्या मते मार्क्सवादयांनी भांडवलवादाची केलेली व्याख्या चुकीची आहे. कामगारांची हुकुमशाही आवश्यक नाही. त्याच्या मते राजकीय लोकशाही आणि उदारमतवादी स्वातंत्र्य अधिक महत्वपुर्ण आहे. कामगारांची हुकुमशाही आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१. राजकीय सिध्दांत परिचय : संपादक- राजकीय भार्गव अशोक आचार्य अनुवाद हेमत खानझोडे - person २०११
२. राजकीय विचारप्रणाली - प्राचार्य डॉ. पी.डी.देवरे प्रा.डॉ. एस.एम. विसपुते - प्रा.डॉ. डी.एस. निकुंभ - प्रशांत पब्लिकेशनस- जळगांव - २००३
३. समकालीन जागतिक राजकारण - डॉ. शैलेन्द्र देवळाणकर - विद्याबुक्स पब्लिशर्स - औरंगाबाद - २०११
४. राजकीय विचार प्रणाली - प्रा.संतोष पाटील
५. राजकीय विचार प्रणाली - डॉ.यु. डी सावंत - प्रा. सुर्यवंशी
6. Democracy Good Goverance and human Rights- S.R. Mujwar. N.K. Sardar- Mangalam Publications - Delhi- 2012